Tree NOC
Circular
28
2013

बृहन्मुंबई महानगरपालिका

उद्यान खाते

परिपत्रक

क्र.0041/33/2013-JTMC-DMU dated 17/06/13

विषयः महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५, मधील कलम ८ अंतर्गत झाडे कापणे व पुनर्रोपित करण्याबाबत

---

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५, मधील कलम ८ अन्वये विविध विकास कामात येणा-या वृक्ष कापणे तसेच पुनर्रोपित करण्याबाबतही परवानगी देण्यात येते. यासाठी विविध सर्वाजनिक पायाभूत सुविधांची विकासकामे करणा-या संस्था, तसेच खाजगी इमारत, व्यावसायिक, वास्तुशास्त्रज्ञ इ. कडून अर्ज प्राप्त होतात.

विविध विकास करणा-या संस्थांकडून पायाभूत सुविधांबाबत अर्ज वृक्ष प्राधिकरण अधिका-यांकडे केला जातो . याजबरोबर खाजगी जमिनीवरील विकासाअंतर्गत येणा-या वृक्षांच्या कापण्याबाबतचा प्रस्ताव संबंधित विकासकाकडून प्राप्त होतो. हे प्रस्ताव उद्यान खात्याकडे देण्यापूर्वीच इमारत प्रस्ताव विभागाकडून विकासकामास वृक्ष प्राधिकरणाच्या ना हरकत प्रमाणपत्रा सापेक्ष परवानगी दिलेली असते. असे आढळून आले आहे की या कार्यप्रणाली मध्ये विलंब होतो व त्यामुळे विकास कामे अडून राहतात. वृक्ष प्राधिकरणाच्या दि.५.३.२०१३च्या बैठकीत असे आदेश दिले होते की सदर कार्यप्रणाली सुटसुटीत व अंमलबजावणीस योग्य अशी तयार करावी. यावर विचार विनिमय केल्यानंतर खालील प्रमाणे प्रस्ताविण्यात येत आहे.

1. विकास कामात येणा-या वृक्ष कापणे तसेच पुनर्रोपित करण्याबाबतही परवानगी देण्यासाठी कार्यप्रणाली क्र. DySG/TA/MC/५६८ दि.७.१०.२००६ तसेच वृक्ष प्राधिकरणचा विषय क्रमांक १७६ वृक्ष प्राधिकरणच्या दि. ७.१०.२००६ रोजी क्र.म.चि./६७८५/वृप्रा दि. ७.११.२००६ सभेत ठराव संमत करण्यात आला आहे.

2. या कायद्या अंतर्गत प्राप्त होणारे अर्ज वास्तुशास्त्रज्ञ, जागेचे मालक इ. कडून प्राप्त होतात. असे आढळून येते की यात मुख्यत: झाडांच्या कापण्याबद्दलचा व काही प्रसंगी पुर्नरोपित करण्याचा आग्रह असतो परंतु ही झाडे जगत नाही याची कारणमीमांसा करता असे आढळले आहे की पुर्नरोपण शास्त्रशुध्द पध्दतीने केले जात नाही. यासाठी संबंधित विकासकानी अर्हताप्राप्त वनस्पती विद्या शास्त्रज्ञाची (Horticulturalist) मदत घेतलेली नसते. यामुळे यापुढे असे सर्व अर्ज अशा वनस्पती विद्या शास्त्रज्ञामार्फत परिशिष्ट-1 नुसार प्रत्येक झाड निहाय अर्ज करणे आवश्यक राहिल.

3. महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पांतर्गतील झाडे कापणे/पुर्नरोपण प्रस्तावाबाबत

संबंधित खाते प्रमुख वरील कार्यप्रणाली वापरुन प्रस्ताव तयार करेल व तो वृक्ष प्राधिकरण अधिकारी

J- 17105 (1-4)

यांच्याकडे सादर करेल. वृक्ष प्राधिकरण अधिकारी पुढील कामकाजाच्या ४५ दिवसात स्वत:च्या अभिप्रायासह वृक्ष प्राधिकरणाला सादर करेल.

4. शासकीय व निम शासकीय संस्थांमार्फत झाडे कापणे/पुर्नरोपण प्रस्तावाबाबत

संबंधित शासकीय संस्था वरील कार्यप्रणाली वापरुन प्रस्ताव तयार करेल व तो वृक्ष प्राधिकरण अधिकारी यांच्याकडे सादर करेल. वृक्ष प्राधिकरण अधिकारी पुढील कामकाजाच्या ४५ दिवसात स्वत:च्या अभिप्रायासह वृक्ष प्राधिकरणाला सादर करेल.

5. खाजगी विकासक यांच्याकडून आलेले प्रस्ताव

अ)ज्या भूखंडावर विकासाची कामे होणार आहेत व त्याच भूखंडावर एकही झाड अस्तित्वात नसल्यास तसे प्रमाणपत्र इमारत प्रस्ताव विभागातील संबंधित अधिका-यांनी तशी नोंद घेऊन प्रस्ताव पारित करण्यास हरकत नाही. यामुळे असे प्रस्ताव ना हरकत प्रमाणपत्रासाठी वृक्ष प्राधिकरण अधिकारी/उद्यान अधीक्षक यांना पाठवू नयेत.

ब) ज्या भूखंडावर विकासाची कामे होणार आहेत व त्याच भूखंडावर झाडे अस्तित्वात आहेत परंतु प्रस्तावित विकास कामामध्ये या झाडांचा अडथळा नाही अशा झाडांची माहिती नोंदणीकृत वनस्पती उद्यान शास्त्रज्ञ परिशिष्ट 'अ' नुसार तयार करुन संबंधित इमारत प्रस्ताव विभागास सादर करतील. यानुसार अधिकारी प्रमाणित करतील याचबरोबर असे प्रस्ताव उद्यान अधीक्षक यांना माहितीसाठी पाठविण्यात येतील. उद्यान अधीक्षक झाडांबाबतच्या या प्रस्तावात काही त्रुटी आढळल्यास प्रस्ताव मिळाल्यापासून 7 दिवसांत इमारत प्रस्ताव अधिका-याच्या निदर्शनास आणतील.

क)ज्या भूखंडावर विकासाची कामे होणार आहे व अशा भूखंडावरील विकास कामात अडथळा निर्माण होणा-या झाडांबाबत मागील अनेक प्रस्तावात असे आढळून आले आहे की अनेकदा गाडयांचे वाहनतळ, अनेक स्तरीय पोडीयम बांधण्यासाठी, वाहणांच्या वाहतुकीसाठी व फायर इंजिनसाठी मोठया प्रमाणात झाडे कापण्याचे प्रस्ताव येतात. या शहरात तसेच अशा नविन इमारतीमधील लोकांनाही जशी गाडयांची आवश्यकता आहे त्यापेक्षा ही जास्त वृक्षांची आवश्यकता आहे.

प्रत्येक वास्तुविपारदाने अस्तितवात असलेली झाडे मुंबई अग्निशामन दल व वाहतुक विभाग यांच्या ना हरकत परवाना अर्जासोबतच्या नकाशात दाखवावी, अशा झाडांच्या कापणीची आवश्यकतेची शिफारस संबंधित खात्याकडून दिलेल्या ना हरकत परवाण्यात अंतर्भुत करावी.

मुंबई अग्निशामन दलाच्या गरजा व पार्किंगच्या गरजा वगळुन जर वृक्ष तोडणी प्रस्तावित केली असेल अशा परिस्थितीत संबंधित विकासकाने झाडे न कापता इमारतीची रचना कशी करता येईल ते पहावे व त्यानंतर सुध्दा झाडे कापण्याची आवश्यकता वाटल्यास खालील प्रमाणे पध्दती अवलंबविण्यात यावी.

संबंधित विकासक/वास्तुशास्त्रज्ञाने प्रथमत: इमारत प्रस्ताव विभागास बांधकामाचा प्रस्ताव सादर

J-17105 (2)

करताना स्पष्टपणे कोणती व किती झाडे कापावी लागतात याचा सविस्तर आराखडा वनस्पती उद्यान शास्त्रज्ञ यांच्या मार्फत परिशिष्ट अ अन्वये झाड निहाय सादर करावा. याचबरोबर संबंधित झाडे का कापणे आवश्यक आहे याबाबत खालील दोन बाबी द्याव्यात:

(1) प्रत्येक झाड निहाय कापण्याची सविस्तर कारणे द्यावीत.

(2) झाड कापायचे नसल्यास कशा प्रकारची झाड निहाय सूट हवी आहे हे द्यावे.

वरीलप्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाल्यावर इमारत प्रस्ताव विभागातील संबंधित अधिकारी, उद्यान खात्यातील परिमंडळ निहाय असलेले अधिकारी आणि संबंधित वास्तुविशारद यांच्या समवेत बैठक घेतील व संबंधित विकासक वास्तुशास्त्रज्ञास योग्य त्या पध्दतीने प्रस्ताव सुधारण्यास सांगतील जेणेकडून झाडे कापणे आवश्यक होणार नाही व हे शक्य नसल्यास झाडे वाचविण्यासाठी आयुक्तांमार्फत कोणकोणती सुट देणे आवश्यक आहे हे ही ठरवतील व तसा प्रस्ताव आयुक्तांना पाठवतील व ज्या ठिकाणी नियमानुसार सुट देणे व झाडे वाचविण्यासाठी नकाशातही बदल करणे शक्य नाही अशा प्रसंगी अशा झाडांचा प्रस्ताव वरील सर्व बाबी नमूद करुन प्रस्ताव, संबंधित परिमंडळीय उपउद्यान अधीक्षक यांच्याकडे सादर करतील.

प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून मुद्दा क्र.१ मध्ये नमूद केलेली सर्व प्रक्रिया पूर्ण करुन ४५ दिवसाच्या आत वृक्ष प्राधिकरणास सादर करतील.

6) विकास कामाव्यतिरिक्त काही प्रसंगी वृक्षांचे निर्मुलन अथवा छाटणी करणे आवश्यक असते यावरील कार्यपणाली खालील प्रमाणे राहील

अ. मृत वृक्षाबाबत:

रस्ते, उद्याने, मैदाने इतर सार्वजनिक मोकळया जागा, मनपाच्या जागा यावर मृत वृक्ष आढळल्यास व यामुळे वाहतुक व इतर बाबींसाठी अडथळा निर्माण होत असल्यास सहाय्यक उद्या अधीक्षकांमार्फत पाहणी करुन हे वृक्ष मृत असल्याबाबत अभिप्राय दिले जातील व त्यानंतर विभाग कार्यालयामधील उद्यान खात्यातील अधिका-यांमार्फत अशा वृक्षांचे निर्मुलन केले जाईल. निर्मुलन करताना हे मुळासकट होईल हे पहावे. उपरोक्त नमूद जागांव्यतिरिक्त इतर ठिकाणी संबंधित प्राधिकरण अथवा खाजगी व्यक्ती संबंधित विभागाच्या उद्यान खात्यामध्ये अर्ज करतील व यानंतर पुढील 7दिवसांत सहाय्यक उद्यान अधीक्षक पाहणी करुन सदर झाड मृत असल्याचा अभिप्राय देतील व यानंतर संबंधित प्राधिकरण अथवा खाजगी व्यक्ती अशा वृक्षाचे निर्मुलन करु शकतील. मात्र असे निर्मुलन करण्यापूर्वी,करताना व केल्यानंतर अशा वृक्षाचे स्पष्ट छायाचित्रे घेणे अत्यावश्यक राहील. सदर छायाचित्रे संबंधित प्राधिकरण अथवा खाजगी व्यक्ती विभाग खात्यामधील उद्यानखात्यात संग्रहीत करण्यासाठी ७ दिवसात सादर करतील.

ब. धोकादायक असलेली झाडे

उ-१७/०५-(३)

रस्ते, उद्याने, मैदाने इतर सार्वजनिक मोकळया जागा, मनपाच्या जागा यावर धोकादायक असलेली झाडे आढळल्यास व यामुळे वाहतुक व इतर बाबींसाठी अडथळा निर्माण होत असल्यास सहाय्यक उद्यान अधीक्षकांमार्फत पाहणी करुन त्याबाबत अभिप्राय देतील व अशा झाडांची छाटणी कशा प्रकारे करावी हे स्पष्ट पणे नमूद करतील. तसेच छाटणी केल्यनंतर झाडाच्या तुटलेल्या भागांवर योग्य त्या प्रकारची लेपन करतील. इतर ठिकाणी संबंधित प्राधिकरण अथवा खाजगी व्यक्ती संबंधित विभागाच्या उद्यान खात्यामध्ये अर्ज करतील व यानंतर पुढील ७ दिवसांत सहाय्यक उद्यान अधीक्षक झाडाची पाहणी करुन सदर धोकादायक झाड असल्याचा अभिप्राय देतील व यानंतर संबंधित प्राधिकरण अथवा खाजगी व्यक्ती अशा झाडाचे निर्मुलन करु शकतील. मात्र असे निर्मुलन करण्यापूर्वी,करताना व केल्यानंतर अशा वृक्षाचे स्पष्ट छायाचित्रे घेणे अत्यावश्यक राहील. सदर छायाचित्रे संबंधित प्राधिकरण अथवा खाजगी व्यक्ती विभाग खात्यामधील उद्यानखात्यात संग्रहीत करण्यासाठी ७ दिवसात सादर करतील.

क. वृक्ष छाटणी

रस्ते, उद्याने, मैदाने इतर सार्वजनिक मोकळया जागा, मनपाच्या जागा यावर झाड धोकादायक होऊ नये, पडू नये वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये अशा वृक्षांचे आयुष्यमान वाढावे, समतोल टिकावा व वाढ चांगली व्हावी यासाठी झाडाची विविध प्रकारे छाटणी करणे आवश्यक असते. विभाग कार्यालयातील विभागातील उद्यान खात्याच्या अधिका-यांमार्फत वेळोवेळी पाहणीकरुन आवश्यकतेनुसार छाटणी करतील व छाटणी केलेल्या भागावर योग्य ते लेपन लावतील. इतर ठिकाणी संबंधित प्राधिकरण अथवा खाजगी व्यक्ती संबंधित विभागाच्या उद्यान खात्यामध्ये अर्ज करतील व यानंतर पुढील 7 दिवसांत संबंधित अधिकारी जागेची पाहणी करुन सदर वृक्ष छाटणी करण्याबाबत अभिप्राय देतील व यानंतर संबंधित प्राधिकरण अथवा खाजगी व्यक्ती अशा झाडाची छाटणी वृक्षाचे निर्मुलन करु शकतील. मात्र अशी छाटणी करण्यापूर्वी,करताना व केल्यानंतर अशा वृक्षाचे स्पष्ट छायाचित्रे घेणे अत्यावश्यक राहील. सदर छायाचित्रे संबंधित प्राधिकरण अथवा खाजगी व्यक्ती विभाग खात्यामधील उद्यानखात्यात संग्रहीत करण्यासाठी ७ दिवसात सादर करतील.

[signatures]

उद्यान अधीक्षक | प्रमुख अभियंता (विकास नियोजन) | सह आयुक्त (आव्य) | अति.आयुक्त(पू.उ) | मान. आयुक्त

प्रत-
1) उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी व उद्यान खात्यातील सर्व संबंधित अधिकारी.
2) सर्व सहाय्यक आयुक्त (ए ते टी विभाग) 3) सर्व म.न.पा उपायुक्त (परि.१ ते ७)
3) प्रमुख अभियंता (रस्ते व वाहतुक)
4) प्रमुख अभियंता (विकास व नियोजन): सदर परिपत्रकाची प्रत आपल्या खात्यातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांना वितरित करण्यात यावी.
5) संचालक (माहिती तंत्रज्ञान): सदर परिपत्रक म.न.पा च्या संकेतस्थळावर व ई-ऑफीस कार्यप्रणाली प्रसिद्ध करण्यात यावे.

(५)